आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार, दिनांक ०२ जुलै २०२४

ठळक बातम्या

- तिसऱ्या कार्यकाळात आपलं सरकार तीनपट अधिक काम करणार - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं राष्ट्रपतींच्या धन्यवाद प्रस्तावावर चर्चेला उत्तर.
- शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला, युवा आणि वारकरी यांच्या कल्याणासाठी सरकार कार्यरत- राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांचं उत्तर.
- दीक्षाभूमीच्या पाहणीसाठी विधानसभा अध्यक्षांनी समिती नेमावी-विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची मागणी.
- विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे पाच दिवसांसाठी निलंबित.

*****

नरेंद्र मोदी-लोकसभा

आपल्या सरकारला देशाच्या नागरिकांनी तिसऱ्यांदा निवडून दिलं आहे. आता आपले सरकार तीनपट अधिक काम करून दाखवेल आणि देशाला झपाट्याने प्रगतीच्या वाटेवर नेईल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरच्या चर्चेला पंतप्रधान मोदी यांनी लोकसभेत उत्तर दिलं त्यावेळी ते बोलत होते. जनसेवा हीच प्रभूसेवा मानून आम्ही आजवर कार्य केलं आहे. त्यामुळे १० वर्षांत २५ कोटी गरीब दारिद्रय रेषेच्या वर आले आहेत. त्यामुळेच लोकांनी तिसऱ्यांदा आम्हाला निवडून देऊन आशीर्वाद दिल्याचे सांगत,'हमने तुष्टीकरण नाही संतुष्टीकरण किया है' असं मोदी म्हणाले. आपल्या सरकारची भ्रष्ट्राचाराप्रति शून्य सहिष्णुता नीती असल्याने जनतेने आपल्यावर कायम विश्वास दाखवला आहे. आपल्या सरकारचा प्रत्येक निर्णय हा केवळ राष्ट्र प्रथम, भारत प्रथम या ध्येयाला समर्पित असल्याचं प्रतिपादन मोदी यांनी केलं.आपलं सरकार संविधानाला अनुसरून 'सर्वधर्म सर्वपंथ' यांच्या कल्याणाचा विचार केंद्र स्थानी ठेवत असल्याचं ते म्हणाले. यावेळी मोदींनी गृहनिर्माण, गरीब कल्याण, दहशतवादाचा बिमोड इत्यादी विषयांना देखील स्पर्श केला. दरम्यान, मोदींनी संबोधन करण्यास सुरवात केल्या पासून विरोधकांनी सरकार विरोधी घोषणा

द्यायला सुरवात केली. त्यांनी नीट, पेपरफुटी आणि अन्य सरकारी धोरणांबाबत घोषणाबाजी केली.

लोकसभा/राज्यसभा-धन्यवाद प्रस्ताव

तत्पूर्वी, देशाची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर असूनही देशात दरडोई उत्पन्न कमी असल्याबद्दल समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव यांनी सवाल उपस्थित केला. स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटल्याच्या प्रकरणाचा उल्लेख करुन त्यांनी आरोप केला की या सरकारला युवकांना रोजगार द्यायचा नाहीय. तर काँग्रेसने भूतकाळात आपल्या मित्रपक्षांना नेस्तनाबूत केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणात केला. राष्ट्र उभारणीच्या कामात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारला महाराष्ट्रातलं महायुती सरकार पाठिंबा देईल, असं ते म्हणाले. तर राज्यसभेत तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांनी, रालोआ सरकार राज्यांचे अधिकार काढून घेत असल्याबद्दल टीका केली. तर लोकसभा निवडणुकीत संविधानाविषयी चुकीचं कथानक पसरवण्यात आलं असं भाजपाचे अशोक चव्हाण यांनी सांगितलं. नीट परीक्षेतल्या घोटाळ्याची चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-विधानसभा

शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला, युवा आणि वारकरी यांच्या कल्याणासाठी सरकार कार्यरत असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर विधानसभेत उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ ६५ वर्ष वयापर्यंतच्या लाभार्थ्यांना देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. याशिवाय जमिनीची अट काढून टाकली आहे, असं आश्वासन शिंदे यांनी विधानसभेत दिलं. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना लगेच मदतीची रक्कम जमा करू. उर्वरित महिलांना अर्ज आणि पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाली की जुलै पासूनचे पैसे दिले जातील असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना त्यांनी अर्थ संकल्पातील घोषणांची उजळणी केली. या सर्व घोषणांसाठी पुरेशा निधीची तरतूद केली आहे. यामुळे जनतेला १ लाख कोटी रुपयांचा लाभ मिळेल, असंही ते म्हणाले. महायुती सरकारच्या काळात १ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना लाभ झाला. आधीच्या सरकारच्या तुलनेत लाभार्थी संख्येत ९५ टक्के आणि लाभ दिल्या जाणाऱ्या रकमेत ६१ टक्क्यांची वाढ झाली आहे. परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. त्यामुळे

विरोधकांनी राज्याच्या बदनामीचे प्रयत्न करू नये, असं आवाहन त्यांनी केलं. यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणाचा प्रस्ताव आवाजी मतदानाने विधानसभेत मंजूर झाला.

राज्यपालांच्या अभिभाषण चर्चा-विधान परिषद

विधानपरिषदेत आज राज्यपालांच्या अभिभाषणाच्या धन्यवाद प्रस्तावावर चर्चा झाली. त्यानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी तालुका पातळीवर तीन अशासकीय सदस्यांची समिती स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. या योजनेच्या नोंदणीसाठी काही लोक बेकायदा पद्धतीने पैसे घेत असल्याचा औचित्याचा मुद्दा आमदार अमोल मिटकरी यांनी उपस्थित केला, त्याला उत्तर देताना ते बोलत होते. यानंतर, कुठल्याही पक्षाचे गटनेते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी उर्वरित कामकाज उद्या सुरू करण्याची घोषणा केली आणि सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

अंबादास दानवे निलंबित-विधान परिषद

काल दिनांक १ जुलै रोजी विधानपरिषदेत बोलताना भाजपचे आमदार प्रसाद लाड यांच्याप्रति आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या काळात पाच दिवसांसाठी निलंबन करण्याचा ठराव आज विधानपरिषदेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा ठराव मांडला. यासंदर्भात विरोधकांची बाजू ऐकून घेण्यात यावी, असा आग्रह विरोधी पक्षांनी केला, मात्र अशा प्रकारच्या ठरावांवर कधीही चर्चा होत नाही, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. यावर विरोधकांनी हौद्यात उतरून उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात घोषणाबाजी केली आणि या निर्णयाच्या विरोधात सभात्याग केला. या गदारोळातच विविध विषयांवरची कागदपत्रं सभागृहासमोर ठेवण्यात आली. विरोधकांच्या सभात्यागानंतर डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली. या विषयावर झालेल्या गटनेत्यांच्या बैठकीत अंबादास दानवे अनुपस्थित होते, आपल्याकडून झालेल्या वर्तनाबाबत कोणतीही अपराधीपणाची भावना त्यांच्या वर्तनात नव्हती. याला आळा न घातल्यास महिलांना असुरक्षित वाटेल, असं वातावरण निर्माण होईल. ते होऊ नये, यासाठी अतिशय दुःखी अंतःकरणाने हा निर्णय घेतला जात असल्याचं डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केलं.

चवदार तळे/दीक्षा भूमी-विधानसभा

महाडच्या चवदार तळ्याच्या सुशोभीकरणासाठी ६५ कोटीं रुपयांच्या प्रस्तावाला १५ दिवसात उच्चस्तरीय समितीकडून मंजुरी देऊन, काम सुरू करू असं आश्वासन उदय सामंत यांनी दिलं आहे. ते आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाच्या उत्तरात बोलत होते. नागपूर इथं दीक्षाभूमी परिसरातल्या वाहनतळ प्रश्नी तोडगा काढण्यासाठी विधानसभा अध्यक्षांनी समिती पाठवावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. काँग्रेसचे नितीन राऊत यांनीही यासंदर्भात समिती स्थापन करण्याची मागणी केली. यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याची सूचना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. इंदू मिल इथलं भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचं स्मारक आणि चवदार तळे सुशोभीकरणाचं काम लवकर पूर्ण करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याची सूचना वडेट्टीवार यांनी केली.

शिक्षक मतदारसंघ निकाल

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या चार जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून यात दोन जागांवर महाविकास आघाडी तर दोन जागांवर महायुती विजयी झाली आहे. मुंबईतल्या दोन्ही म्हणजे मुंबई शिक्षक आणि मुंबई पदवीधर मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांनी विजय मिळवला. मुंबई पदवीधरमधून अनिल परब हे ४४ हजाराहून अधिक मतांनी विजयी झाले. तर शिक्षक मतदारसंघात शिक्षक भारतीचं सलग पंधरा वर्षांचं वर्चस्व मोडित काढत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज. मो. अभ्यंकर यांनी विजय मिळवला. कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपाच्या निरंजन डावखरे यांनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला. त्यांना एक लाखापेक्षा जास्त मतं मिळाली. तर नाशिक शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किशोर दराडे हे विजयी झाले.

विधान परिषद अर्ज

विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीचे अर्ज भरायचा आज शेवटचा दिवस आहे. आतापर्यंत ११ जागांसाठी १२ उमेदवारांनी एकूण १९ अर्ज भरले आहेत. भाजपच्या पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे यांनी आज अर्ज भरले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाणे आणि भावना गवळी यांनी अर्ज भरला. काँग्रेसनं प्रज्ञा सातव यांना पुन्हा संधी दिली असून त्यांनीही आज अर्ज भरला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर यांनीही अर्ज भरला असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने जयंत पाटील यांना पाठिंबा जाहीर केला आहे. या सर्व उमेदवारांनी आज अर्ज भरले. विधानसभा सदस्यांमधून यापैकी ११ सदस्य विधान परिषदेवर निवडून जाणार आहेत.

तीन नवीन कायदे

केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी देशात कालपासून लागू झालेले तीन नवीन कायदे शिक्षा देण्यापेक्षा न्यायाभिमुख आणि पीडित केंद्रित असल्याचं सांगितलं. नव्या कायद्यांमध्ये शिक्षा करण्यापेक्षा न्याय देण्याला, वेगवान सुनावणीला आणि विलंबाऐवजी जलदगतीने न्याय देण्याला प्राधान्य देण्यात आले आहे आणि पीडितांच्या अधिकारांचे रक्षण सुनिश्चित करण्यात येईल, असं ते म्हणाले. ते काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. नव्या फौजदारी कायद्यांसंदर्भात लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करण्याच्या उद्देशाने या कायद्यांबाबत अनेक गैरसमजुती पसरवण्यात येत आहेत, असं शाह यांनी सांगितलं. या कायद्यांच्या प्रत्येक पैलूबाबत विविध हितधारकांसोबत चार वर्षे सखोल चर्चा करण्यात आली आहे, आणि स्वतंत्र भारतात इतक्या विस्ताराने कोणत्याही कायद्याबाबत चर्चा झालेली नाही, अशी माहिती त्यांनी दिली.

सुधाकर अडबाले

शालेय शिक्षण विभागानं १५ मार्च २०२४ रोजी काढलेले शिक्षकांवर अन्याय करणारे संचमान्यतेचे सुधारित निकष आणि प्राथमिक शाळांचे सक्षमीकरण आणि दर्जावाढ करण्याबाबतचे शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावे यासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीनं विदर्भात ५ जुलै रोजी आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह आमदार सुधाकर अडबाले यांनी शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन यांची मंत्रालयात भेट घेऊन प्रांताध्यक्ष आणि सरकार्यवाह यांच्या संयुक्त सहीचं निवेदन सादर केलं आहे.

*****